निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
सोमवार
१६ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३५१ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## संक्षिप्त

### पाचोड येथे ३८ वी राष्ट्रीय अर्थशास्त्र परिषद उत्साहात संपन्न; शाश्वत विकास आणि सर्वसमावेशक धोरणांवर सखोल मंथन



**आत्ताच एक्सप्रेस**

**पाचोड (प्रतिनिधी)** पाचोड येथील शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'पीएम उषा सॉफ्ट कंपोनंट' आणि 'अर्थशास्त्र विभाग' यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित ३८ व्या राष्ट्रीय अर्थशास्त्र परिषदेचा सांगता सोहळा अत्यंत उत्साहात आणि शैक्षणिक वातावरणात पार पडला. दोन दिवस चाललेल्या या परिषदेत देशातील बदलती सामाजिक-आर्थिक परिस्थिती, शाश्वत विकास आणि जागतिक आव्हाने यांवर देशभरातील तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले.

कृषी आणि उद्योगाचा समन्वय हीच प्रगतीची गुरुकिल्ली

समारोप प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना डॉ. विलास खंदारे यांनी भारताच्या शाश्वत विकासाचा आराखडा मांडला. ते म्हणाले की, देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी उद्योग आणि शेती या दोन्ही क्षेत्रांमध्ये समन्वय असणे अनिवार्य आहे. केवळ औद्योगिक धोरणे आखून चालणार नाही, तर जलसिंचन व्यवस्थेची परिणामकारक अंमलबजावणी आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाधारित शेती हीच भविष्यातील अर्थव्यवस्थेची खरी किल्ली ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

डॉ. दिलीप अर्जुने यांनी जागतिक स्तरावरील बदलत्या समीकरणांवर भाष्य केले. सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे जागतिक व्यापारावर होणाऱ्या विपरित परिणामांकडे लक्ष वेधत ते म्हणाले की, अशा अस्थिर जागतिक परिस्थितीत भारताने कृषी क्षेत्रावर अधिक लक्ष केंद्रित करून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी आपल्या भाषणात वाढत्या आर्थिक विषमतेवर चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, श्रीमंत अधिक श्रीमंत आणि गरीब अधिक गरीब होत चालला आहे. ही वाढती आर्थिक दरी कमी करण्यासाठी शासनाने सर्वसमावेशक आणि ठोस योजना राबवणे ही काळाची गरज आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची फळे पोहोचली पाहिजेत.

परिषदेच्या सुरुवातीला डॉ. शिवाजी यादव यांनी प्रास्ताविकातून दोन दिवसांच्या चर्चासत्रांचा आढावा घेतला. समकालीन आर्थिक प्रश्नांवर संशोधक आणि अभ्यासकांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे हा या परिषदेचा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले.

या सोहळ्याला डॉ. दिलीप अर्जुने, डॉ. अर्जुन मोरे, तसेच मराठवाडा अर्थशास्त्र परिषदेचे सचिव व कोषाध्यक्ष डॉ. विश्वनाथ कोकर यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संतोष चव्हाण यांनी केले, तर आभार डॉ. ह. सो. बिडवे यांनी मानले.ही परिषद यशस्वी करण्यासाठी डॉ. सुरेश नलावडे, डॉ. सुभाष पोटभरे, डॉ. भगवान जायभाय, डॉ. उत्तम जाधव, डॉ. गांधी बानायत, डॉ. विलास महाजन, डॉ. हेमंत कुमार जैन, डॉ. तुकाराम गावंडे, प्रा. विनोद कांबळे, प्रा. सचिन कदम, प्रा. संदीप सातोणकर, डॉ. विठ्ठल देखणे, प्रा. नितीन चित्ते, प्रा. अरुणा दसपुते यांच्यासह सतीश वाघ, गजानन इंगळे, मुरलीधर जिने आणि महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### लाडके विद्यार्थी' योजना राबवून शिक्षण मोफत करा- डॉ. हुलगेश चलवादींचे सरकारला आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस/पुणे/प्रतिनिधी/**केरळच्या धर्तीवर महाराष्ट्रातही 'लाडके विद्यार्थी' योजना सुरू करून सर्व शाखांचे पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करावे, असे आवाहन बहुजन नेते डॉ. हुलगेश चलवादी यांनी पुण्यात केले.राज्यात ९ वी आणि १० वी दरम्यान शिक्षण सोडणाऱ्या मुला-मुलींचे प्रमाण वाढत असून, आर्थिक अडचणींमुळे अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहत आहेत. सध्या आरटीई अंतर्गत केवळ आठवीपर्यंतच मोफत शिक्षण मिळते, ज्यामुळे गोरगरीब विद्यार्थ्यांचे पुढे शैक्षणिक खच्चीकरण होत असल्याचे डॉ. चलवादी यांनी नमूद केले.केरळचा आदर्श: केरळने पदविका अभ्यासक्रम मोफत केला आहे, तसेच पाऊल महाराष्ट्राने उचलावे.सामाजिक न्याय: फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचा वारसा जपत शैक्षणिक समता प्रस्थापित करावी.

# महाशिवरात्रीला टीम इंडियाचा 'विजयाभिषेक'!

## सूर्याच्या सेनेने पाकिस्तानला चारमुंड्या चित करत उडवला धुरळा!



**आत्ताच एक्सप्रेस**

**कोलंबो/ प्रतिनिधी/** महाशिवरात्रीचा पावन मुहूर्त आणि समोर पारंपरिक शत्रू पाकिस्तान वातावरण आधीच तापलेलं होतं, पण मैदानात उतरल्यावर टीम इंडियाने जो 'तांडव' घातला, त्याने अवघ्या क्रिकेट विश्वाचे डोळे दिपले. टी-२० विश्वचषक २०२६ च्या सर्वात मोठ्या 'हाय-व्होल्टेज' सामन्यात सूर्यकुमार यादवच्या यंग ब्रिगेडने पाकिस्तानचा ६१ धावांनी अक्षरशः धुव्वा उडवला. या विजयासह भारताने दिमाखात 'सुपर-८' मध्ये धडक मारली असून, पाकिस्तानला स्पर्धेबाहेरचा रस्ता दाखवण्याची तयारी पूर्ण केली आहे.

ईशान किशनचे तुफानी 'तांडव': पाकिस्तानी गोलंदाजीची पिसे काढली!

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला उतरलेल्या टीम इंडियाच्या मनात काहीतरी वेगळंच होतं. सलामीवीर ईशान किशनने मैदानात पाऊल ठेवताच पाकिस्तानी गोलंदाजांचा कर्दनकाळ ठरला. त्याने अवघ्या ४० चेंडूत ७७ धावांची झंझावाती खेळी केली, ज्यात १० चौकार आणि ३ गगनभेदी षटकारांचा समावेश होता.

कर्णधार सूर्यकुमार यादवने (३२ धावा) ईशानला मोलाची साथ दिली. या जोडीने पाकिस्तानी गोलंदाजीची अक्षरशः लक्तरे वेशीवर टांगली. निर्धारित २० षटकांत भारताने १७५ धावांचा डोंगर उभा करत पाकिस्तानला बॅकफुटवर ढकलले.

**पाकिस्तानी फलंदाजीचा 'फ्लॉप शो'; भारतीय गोलंदाजांचा भेदक मारा**



**पाकिस्तानचा स्कोअरः १८ षटकांत सर्वबाद अवघ्या ११४ धावा!**
**विजयाचे अंतरः ६१ धावांची महाकाय जीत!**
**सूर्याचं 'कॅप्टन कूल' नेतृत्व; भारत सुपर-८ मध्ये 'किंग'!**

१७६ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या 'नशिबवान' पाकिस्तानची सुरुवात अत्यंत लाजीरवाणी झाली. भारतीय वेगवान आणि फिरकी गोलंदाजांच्या जोडीने पाकिस्तानच्या फलंदाजीचे कंबरडेच मोडले.

एकाही पाकिस्तानी फलंदाजाला भारतीय माऱ्यासमोर तग धरता आला नाही.

सूर्यकुमार यादवने केवळ फलंदाजीनेच नव्हे, तर आपल्या आक्रमक नेतृत्वानेही सर्वांची मने जिंकली. गोलंदाजीतील बदल आणि लावलेली फिल्डिंग पाकिस्तानला जाळ्यात अडकवण्यासाठी पुरेशी ठरली. सलग ३ विजयांसह ६ गुण खिशात टाकून भारताने अधिकृतपणे सुपर-८ चे तिकीट कन्फर्म केले आहे.

**पाकिस्तानच्या नाकातोंडात पाणी; घरवापसी निश्चित?**

या पराभवानंतर पाकिस्तानच्या गोटात स्मशानशांतता पसरली आहे. भारताने ग्रुपमध्ये अव्वल स्थान गाठले असताना, पाकिस्तान आता स्पर्धेतून बाहेर पडण्याच्या उंबरठ्यावर आहे.

पाकिस्तानचा पुढचा सामना १८ फेब्रुवारीला नामिबियाविरुद्ध आहे. पण हा सामना जिंकूनही फायदा नाही, कारण आता त्यांना दुसऱ्यांच्या 'दयेवर' अवलंबून राहावे लागणार आहे. थोडक्यात सांगायचे तर, पाकिस्तानचे पॅकअप आता जवळजवळ निश्चित आहे!

महाशिवरात्रीच्या दिवशी मिळालेला हा विजय प्रत्येक भारतीय चाहत्यासाठी सुखावणारा ठरला आहे. पाकिस्तानला लोळवून भारताने विश्वचषकावर आपला दावा अधिक मजबूत केला आहे!

# ...हे भस्मासूर, यांची जागा जेलमध्येच!'; गणेश नाईकांचा उपमुख्यमंत्र्यांवर प्रहार

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी मुंबई/प्रतिनिधी/** राज्यातील राजकारण सध्या चांगलेच तापले असून, नवी मुंबईचे बडे प्रस्थ आणि भाजप नेते गणेश नाईक यांनी थेट उपमुख्यमंत्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्यावर शेलक्या शब्दांत हल्लाबोल केला आहे. या भस्मासुरांनी १० वर्षे महाराष्ट्र लुटला, त्यामुळेच राज्य मागे राहिले, अशा घणाघाती शब्दांत नाईकांनी शिंदे पिता-पुत्रांचा समाचार घेतला. या विधानानंतर महायुतीमधील अंतर्गत कलह आता चव्हाट्यावर आला आहे.

**नाईक विरुद्ध शिंदे**

**राजकीय परिणाम काय होणार?**

गणेश नाईक आणि शिंदे कुटुंबियांच्या या वादामुळे ठाणे आणि नवी मुंबईच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे.

**गणेश नाईकांचा 'रुद्र' अवतारः अस्तित्व संपवून टाकेन!**

एका जाहीर कार्यक्रमात बोलताना गणेश नाईक कमालीचे आक्रमक दिसले. त्यांनी केवळ टीकाच केली नाही, तर थेट राजकीय अस्तित्वाची भाषा केली.

**भस्मासूर आणि बकासूरः** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या मुलाने महाराष्ट्राला लुटून खाल्ले आहे. हे राजकारणातील भस्मासूर आणि बकासूर आहेत. यांनी केलेल्या पापांचा घडा भरला की यांची जागा जेलमध्ये असेल, असे खळबळजनक विधान नाईकांनी केले.

**पक्षाला साकडेः** पक्षाने (भाजपने) मला एकदा मोकळीक द्यावी, या दोघांचेही राजकीय अस्तित्व मी संपवून टाकेन. ठाणे आणि पालघरमधील एकही महानगरपालिका यांच्या हातात जाऊ देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

**श्रीकांत शिंदेंना धमकीः** माझ्या नादी लागाल तर श्रीकांत शिंदेंना माजी खासदार केल्याशिवाय राहणार नाही, असेही ते ठणकावून म्हणाले.

डॉ. श्रीकांत शिंदेंचा वैद्यकीय टोलाः वयानुसार विसरभोळेपणा वाढलाय नाईकांच्या या जहरी टीकेला खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनीही तितक्याच तिखट शब्दांत प्रत्युत्तर दिले. पेशाने डॉक्टर असलेल्या श्रीकांत



शिंदेंनी नाईकांच्या विधानाला त्यांच्या वाढत्या वयाशी जोडले. वयोमानानुसार काही आजार जडतात. विसरभोळेपणा, चिडचिड होणे आणि लोकांची दिशाभूल करणे ही त्याचीच लक्षणे आहेत. मी डॉक्टर असल्याने मला हे नीट समजते, असा खोचक टोला श्रीकांत शिंदेंनी लगावला.एवढ्यावरच न थांबता त्यांनी नाईकांना थेट आव्हान दिले की, जर तुमच्यात एवढीच खुमखुमी असेल, तर पुढच्या वेळी ठाणे किंवा कल्याण लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवून दाखवावी.

**उदय सामंतांची एन्ट्रीः नेमका निशाणा कोणावर?**

शिंदे गटाचे मंत्री उदय सामंत यांनीही या वादात उडी घेत गणेश नाईकांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. एकनाथ शिंदेंवर टीका केल्याशिवाय नाईकांना प्रसिद्धी मिळत नसावी, असे ते म्हणाले.

तसेच, नाईकांचा आक्षेप नक्की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर आहे की शिंदेंवर, हे त्यांनी एकदा स्पष्ट करावे, असे सांगत सामंत यांनी नाईकांना पेचात पकडण्याचा प्रयत्न केला.

महायुतीत बिघाडी? नाईक हे भाजपचे महत्त्वाचे नेते आहेत, तर शिंदे स्वतः उपमुख्यमंत्री आहेत. या दोघांमधील वादामुळे आगामी निवडणुकांमध्ये युतीच्या जागावाटपावर परिणाम होऊ शकतो.

ठाणे जिल्हा हा शिंदेंचा बालेकिल्ला मानला जातो, तर नवी मुंबईत नाईकांचे वर्चस्व आहे. या वर्चस्वाच्या लढाईतूनच हा 'वाकयुद्ध' सुरू झाल्याचे स्पष्ट दिसत आहे.या वादावर आता भाजपचे वरिष्ठ नेते (देवेंद्र फडणवीस किंवा बावनकुळे) काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मिनी मंत्रालयासाठी उमेदवार झाले 'देवदास'

### जमिनी गहाण ठेवून लढवल्या निवडणुका

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर / फिरोज मन्सुरी /** राजकारणात सत्तेची नशा एकदा चढली की माणसाला परिणामांची फिकीर राहत नाही, याचा प्रत्यय छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागात येत आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक जिंकण्यासाठी अनेक हौशी उमेदवारांनी आपली पत आणि प्रतिष्ठा पणाला लावली. मात्र, ही प्रतिष्ठा जपण्याच्या नादात अनेकजण आता खाजगी सावकारांच्या विळख्यात अडकले असून, त्यांच्यावर पश्चाताप करण्याची वेळ आली आहे.

**जमिनी गेल्या, सोनेही संपले!**

**सत्तेची नशा, कर्जाचा फास!**

निवडणूक म्हटली की खर्च आलाच, पण गेल्या काही वर्षांत हा खर्च कोट्यवधींच्या घरात गेला आहे. जिल्हा परिषद सदस्य होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या उमेदवारांनी ५० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंत खर्च केल्याच्या चर्चा आहेत. हा पैसा उभा करण्यासाठी अनेकांनी आपल्या हक्काची एक-दोन एकर जमीन सावकाराकडे गहाण ठेवली, तर काहींनी



घरातील सोने तारण ठेवून व्याजाने लाखो रुपये उचलले.

**सविस्तर वृत्त पान २ वर.....**

# महाशिवरात्रीला घृष्णेश्वर चरणी भक्तीचा पूर, मात्र नियोजनाचा पुरता 'बोजवारा'; चेंगराचेंगरीत भाविक जखमी!

आत्ताच एक्सप्रेस

वेरूळ (प्रतिनिधी) बारावे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री क्षेत्र घृष्णेश्वर मंदिर परिसरात महाशिवरात्री निमित्त भाविकांचा महासागर लोटला असला, तरी मंदिर प्रशासन आणि पोलिसांच्या ढिसाळ नियोजनामुळे या भक्तीला गालबोट लागले आहे. रविवारी पहाटेपासूनच दर्शनासाठी ४ ते ५ तासांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मात्र, गर्दीवर नियंत्रण मिळवण्यात अपयश आल्याने मंदिर परिसरात चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती निर्माण झाली, ज्यामध्ये अनेक महिला आणि लहान मुलांना दुखापत झाली आहे.

**प्रशासनाचा दांडा गुल; भाविकांचा संताप अनावर**

महाशिवरात्रीच्या मुहूर्तावर मध्यरात्रीपासूनच भाविकांनी गर्दी केली होती. मात्र, मध्यरात्री १२ ते २ च्या सुमारास मंदिर प्रशासनाचे नियंत्रण पूर्णपणे सुटले. पूर्व आणि दक्षिण द्वारावर कोणताही समन्वय नसल्याने गोंधळ उडाला. अनेक भाविक मिळेल त्या ठिकाणाहून उड्या मारून रांगेत घुसण्याचा प्रयत्न करत होते. या गोंधळात चेंगराचेंगरी झाली असून, यात लहान मुले आणि महिलांच्या पायाला गंभीर दुखापत झाल्याच्या घटना घडल्या आहेत. लाखो भाविक येणार हे माहित असूनही प्रशासनाने ठोस पावले का उचलली नाहीत? असा संतप्त सवाल आता शिवभक्त विचारत आहेत.

**भक्ती मोठी की प्रशासकीय निष्काळजीपणा?**

सलग ४८ तास मंदिर उघडे ठेवण्याचा निर्णय स्वागतार्ह असला, तरी सुरक्षा आणि रांगांचे व्यवस्थापन करण्यात आलेले अपयश अक्षम्य आहे. जखमी झालेल्या भाविकांच्या जखमांना जबाबदार कोण? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

स्थानिक दर्शन व्यवस्था कोलमडली

वेरूळ ग्रामस्थांसाठी पहाटे ४ ते ८ या वेळेत दर्शनाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती. मात्र, बाहेरून आलेल्या भाविकांच्या अलोट गर्दीमुळे ही व्यवस्था पत्त्याच्या बंगल्यासारखी कोलमडून पडली. यामुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी असून, दरवर्षी होणाऱ्या या नियोजनाच्या अभावामुळे प्रशासनावर



गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

वेरूळ घाट झाला 'ट्रॅफिक जाम'चा सापळा

वाहतुकीचे नियोजन कागदावरच असल्याचे आज दिसून आले. प्रशासनाने 'लेणी ते भोसले चौक' नो-व्हेईकल झोन घोषित केला असला, तरी छत्रपती संभाजीनगर आणि खुलताबादकडून येणाऱ्या वाहनांच्या रांगांमुळे वेरुळ घाट पूर्णपणे जाम झाला होता. तासनतास भाविक घाटात अडकून पडल्याने प्रवाशांचे हाल झाले.

**नियोजनाची 'ऐशीतैशी'... तरीही सेवा अखंड**

एकीकडे गोंधळ सुरू असताना, दुसरीकडे काही सामाजिक संस्था आणि भाविकांकडून माणुसकीचे दर्शन घडले.

**प्रसाद वाटपः** भाविकांसाठी उपवासाचे लाडू, साबुदाणा खिचडी, केळी आणि लिंबू सरबताची व्यवस्था करण्यात आली होती.

पालखी सोहळाः सालाबादाप्रमाणे देवाची पालखी निघाली.

शिवालय तीर्थकुंडावर विधीवत पूजा करून पालखी मंदिरात परतली.

पोलीस अधीक्षक विनय कुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली १४७ अंमलदार आणि १४० गृहरक्षक दलाचे जवान तैनात होते, मात्र गर्दीचा ओघ इतका होता की हा फौजफाटा अपुरा पडताना दिसला.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार संतोष गुट्टे, मंदिर देवस्थानचे अध्यक्ष कुणाल दांडगे, उपाध्यक्ष योगेश टोपरे, विश्वस्त संजय वैद्य यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्राच्या मातीतील बेरोजगारांचा आक्रोश!

## डिग्रीचे ओझे आणि खाकीचे स्वप्न

**बीड आणि परभणी जिल्ह्यातून समोर आलेली पोलीस भरतीची आकडेवारी ही केवळ सरकारी नोकरीसाठीची ओढ नाही, तर ती आधुनिक महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेच्या आणि रोजगाराच्या कफनवरची एक 'मार्च पास्ट' आहे. केवळ १२ वी पास पात्रता असलेल्या पोलीस शिपाई पदासाठी चइ-, चउ-, इंजिनियर्स आणि पदव्युत्तर तरुणांची लागलेली रांग पाहून मन सुन्न होते. ज्या हातांनी कॉर्पोरेट जगतात कीबोर्डवर बोटे चालवायला हवी होती, तीच हात आज पोलीस भरतीच्या मैदानावर गोळा फेकण्यासाठी सज्ज झाली आहेत. हे चित्र प्रगत महाराष्ट्राच्या कपाळावर उमटलेले बेरोजगारीचे एक विद्रूप वास्तव आहे.**

**बीडमधील १७४ जागांसाठी ८,१३४ अर्ज येणे ही आकडेवारी जितकी थक्क करणारी आहे, त्याहीपेक्षा धक्कादायक आहे अर्जांची शैक्षणिक पार्श्वभूमी. जेव्हा २,६५३ पदवीधर आणि ३८८ पदव्युत्तर उमेदवार केवळ एका शिपाई पदासाठी मैदानात उतरतात, तेव्हा आपल्या शैक्षणिक धोरणाचे अपयश उघड्यावर पडते. १९ एमबीए पदवीधर कॉर्पोरेट ऑफिस सोडून खाकी वर्दीच्या प्रतीक्षेत आहेत, याचा अर्थ असा की आज पदव्यांची किंमत केवळ कागदाच्या तुकड्याइतकी उरली आहे. बाजारात नोकरी नाही आणि घरात गरिबीचा फास, अशा दुहेरी कात्रीत अडकलेला तरुण आज मैदानावर घाम गाळतोय. ही त्यांची हौस नाही, तर ही त्यांची 'मजबुरी' आहे.**

**पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पारदर्शकतेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला, ही स्वागतार्ह बाब आहे. परंतु, परभणीत केवळ ९७ जागांसाठी १० हजारांहून अधिक अर्ज आल्यावर प्रशासनाला तिथे वैद्यकीय पथके तैनात करावी लागत आहेत, यातच सर्व काही आले. पोलीस होण्याच्या जिद्दीने काही तरुण उत्तेजक पदार्थांचे सेवन करत आहेत, ही बाब अत्यंत गंभीर आहे. आपल्या स्वप्नांचा पाठलाग करताना स्वतःचा जीव धोक्यात घालण्याची वेळ या तरुणांवर का येते? या प्रश्नाचे उत्तर सरकारला द्यावे लागेल.**

**ज्या ठिकाणी गरज अधिक आणि जागा कमी असतात, तिथे भ्रष्टाचाराच्या वाळवीचा शिरकाव होणे स्वाभाविक असते. पोलीस अधीक्षकांनी एजंटांपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे, मात्र मुळात अशी वेळच का येते? पदव्या घेऊनही जेव्हा तरुण हतबल होतो, तेव्हाच तो शॉर्टकटच्या वाटेला लागतो. आज बीड असो वा परभणी, प्रत्येक ठिकाणी तरुण फक्त एक 'शाश्वत नोकरी' शोधतोय. खासगी क्षेत्रातील असुरक्षितता आणि सरकारी नोकरीतील स्थैर्य यांच्या संघर्षात उच्चशिक्षितांचा हा लढा सुरु आहे.पोलीस भरतीच्या मैदानावर धावणारा प्रत्येक तरुण हा केवळ पोलीस होऊ इच्छित नाही, तर तो आपल्या गरिबीतून धाव घेऊ इच्छितोय. इंजिनिअरिंग करून शिपाई पदासाठी अर्ज करणे, हे त्या विद्यार्थ्याचे अपयश नसून त्याला रोजगार पुरवू न शकणाऱ्या व्यवस्थेचे सामूहिक अपयश आहे. केवळ आकडेवारीच्या खेळात न अडकता, सरकारने रोजगाराच्या संधींचे विकेंद्रीकरण करण्याची गरज आहे. अन्यथा, उद्याच्या महाराष्ट्रात फक्त पदव्यांचे डोंगर उरतील आणि हातांना काम नसलेले नैराश्यग्रस्त तरुण रस्त्यावर असतील.**

**वेळ आली आहे या भीषण वास्तवाकडे डोळसपणे पाहण्याची. या तरुणांच्या डोळ्यांत स्वप्ने कमी आणि भविष्याची भीती जास्त दिसतेय. हे चित्र बदलणार कधी? हाच खरा सवाल आहे.**

# शीख समाजातील लंगर सेवा : मानवतेचा समतेचा आणि सेवाभावाचा तेजस्वी आदर्श

भारतीय संस्कृती आणि धर्मपरंपरा विविधतेत एकतेचा संदेश देणारी आहे. या महान परंपरेतील शीख धर्म हा मानवता, समता, सेवा आणि बंधुभाव यांचा संदेश देणारा एक प्रभावी धर्म म्हणून ओळखला जातो. शीख धर्माची सर्वात वैशिष्ट्यपूर्ण आणि जागतिक स्तरावर आदर्श ठरलेली परंपरा म्हणजे लंगर सेवा. लंगर सेवा ही केवळ धार्मिक विधी नसून, ती सामाजिक समतेची, परोपकाराची आणि मानवी करुणेची जिवंत परंपरा आहे.

लंगर सेवेचा ऐतिहासिक उद्गम

लंगर सेवेची संकल्पना शीख धर्माचे संस्थापक गुरू नानक देव जी यांनी १५ व्या शतकात मांडली. त्या काळात भारतीय समाजात जातिभेद आणि सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होती. गुरू नानक देव जी यांनी या अन्यायकारक सामाजिक व्यवस्थेला आव्हान देत सर्व मानव समान असल्याचा संदेश दिला. त्यांनी गुरुद्वारामध्ये सर्वांसाठी मोफत भोजनाची व्यवस्था सुरू करून समाजातील भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

पुढील गुरूंनी लंगर परंपरेला अधिक सुसंगठित आणि व्यापक स्वरूप दिले. विशेषतः गुरू अमरदास जी यांनी 'पंगत' आणि 'संगत' या संकल्पनांचा प्रचार करून लंगर सेवेचा सामाजिक पाया मजबूत केला. गुरुद्वारामध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने गुरूंच्या दर्शनापूर्वी लंगरमध्ये बसून भोजन करावे, असा नियम त्यांनी केला. यामुळे समतेचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजात रुजला.

**लंगर सेवेची तत्त्वज्ञानात्मक संकल्पना**

लंगर सेवेचे तत्त्वज्ञान तीन मूलभूत मूल्यांवर आधारीत आहे- समता, सेवा आणि सामूहिकता. शीख धर्मानुसार देव सर्वत्र आहे आणि सर्व मानव देवाचेच अंश आहेत. त्यामुळे मानवांमध्ये भेदभाव करणे म्हणजे देवाच्या इच्छेचा अवमान करणे होय. लंगर सेवेच्या माध्यमातून समाजातील सर्व स्तरांतील लोक एकाच पंक्तीत बसून भोजन करतात. राजा असो वा सामान्य नागरिक, श्रीमंत असो वा गरीब, स्त्री असो वा पुरुष-सर्वांसाठी समान आसन आणि समान अन्न दिले जाते.

लंगरमध्ये सेवा करणे हे शीख धर्मात अत्यंत पवित्र मानले जाते. अन्न तयार करणे, वाटप करणे, पाणी देणे, भांडी धुणे, स्वच्छता राखणे-हे सर्व कार्य स्वयंसेवक भावनेने केले जाते. या सेवेचे मूळ उद्दिष्ट अहंकाराचा त्याग करून मानवसेवेला सर्वोच्च मानणे हा आहे.

लंगर सेवेची वैशिष्ट्ये आणि कार्यपद्धती

लंगर सेवेची कार्यपद्धती अत्यंत सुव्यवस्थित आणि लोकसहभागावर आधारीत आहे. याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

मोफत भोजन व्यवस्था: लंगरमध्ये कोणालाही शुल्क न देता अन्न दिले जाते.

सर्वधर्मसमभाव: कोणत्याही धर्म, जात, भाषा किंवा देशातील व्यक्तीसाठी लंगर खुले आहे.

सामूहिक भोजन पद्धती: सर्वजण जमिनीवर एकाच पंक्तीत बसून भोजन करतात, ज्यामुळे सामाजिक समतेची जाणीव निर्माण होते.

स्वयंसेवी सहभाग: लंगर सेवा स्वयंसेवकांच्या सहभागावर चालते. समाजातील प्रत्येक व्यक्ती सेवा देऊ शकतो.

साधे आणि सात्त्विक अन्न: लंगरमधील भोजन साधे, पोषणमूल्यपूर्ण आणि सात्त्विक असते.

शिस्त आणि स्वच्छता: लंगरमध्ये स्वच्छता, शिस्त आणि सामूहिक सहकार्य यांना विशेष महत्त्व दिले जाते.

लंगर सेवा आणि सामाजिक परिवर्तन

लंगर सेवा ही केवळ धार्मिक सेवा नसून ती सामाजिक परिवर्तनाची प्रभावी चळवळ आहे. इतिहासात भारतात जातीभेदामुळे समाजात विभाजन होते. लंगरने या विभाजनावर प्रहार करून समानतेचा संदेश दिला. गुरुद्वारामध्ये सर्वजण एकत्र बसून भोजन करतात, त्यामुळे सामाजिक भेदभाव नष्ट होतो आणि बंधुभाव वाढतो.

लंगर सेवा स्त्री-पुरुष समानतेचेही प्रतीक आहे. स्त्रिया आणि पुरुष समान अधिकाराने सेवा करतात. त्यामुळे लिंगभेदाविरुद्ध सामाजिक संदेश दिला जातो. तसेच लंगर सेवा गरीब, गरजू आणि उपेक्षित घटकांसाठी आधारस्तंभ ठरते.

आधुनिक काळातील लंगर सेवेचे जागतिक योगदान

आज लंगर सेवा केवळ भारतापुरती मर्यादित न राहता जागतिक स्तरावर मानवतेची सेवा करणारी चळवळ बनली आहे. भारतातील अमृतसर येथील हरमंदिर साहिब (स्वर्ण मंदिर) येथे दररोज लाखो भाविक आणि पर्यटकांना लंगर दिला जातो. हे जगातील सर्वात मोठ्या सामूहिक भोजन व्यवस्थांपैकी एक मानले जाते.

नैसर्गिक आपत्ती, पूर, भूकंप, दुष्काळ, युद्ध किंवा महामारीच्या काळात शीख समाजाने लंगर सेवेच्या माध्यमातून जगभर मानवतेची सेवा केली आहे. कोरोना महामारीच्या काळात भारतासह विविध देशांमध्ये शीख स्वयंसेवकांनी गरजू लोकांना मोफत भोजन पुरवले. ही सेवा मानवतेसाठी प्रेरणादायी ठरली.

लंगर सेवेचा आध्यात्मिक आणि नैतिक संदेश

लंगर सेवा ही केवळ भौतिक अन्नपुरवठा नसून ती आध्यात्मिक शिक्षणाची प्रक्रिया आहे. सेवा करताना अहंकाराचा त्याग, करुणेची भावना आणि मानवतेचा आदर विकसित होतो. शीख धर्मानुसार सेवा म्हणजेच ईश्वराची पूजा होय. गुरू ग्रंथ साहिबमध्ये सेवेला अत्यंत महत्त्व देण्यात आले असून, सेवेमुळे मानवाला आत्मिक शांती आणि नैतिक उन्नती प्राप्त होते, असा संदेश दिला आहे.

लंगर सेवा मानवी मूल्ये जपण्याची आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करते. प्रत्येक व्यक्ती समाजाचा एक घटक असून समाजसेवेसाठी योगदान देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, ही भावना लंगरच्या माध्यमातून रुजवली जाते.

शासकीय आणि सामाजिक दृष्टिकोनातून लंगर सेवा

शासकीय दृष्टिकोनातून पाहता लंगर सेवा ही सामाजिक समावेशन, अन्नसुरक्षा आणि समुदाय विकासाची प्रभावी संकल्पना आहे. ही सेवा सामाजिक विषमता कमी करण्यास, गरिबी निवारणास आणि आपत्ती व्यवस्थापनात सहाय्यक ठरते. स्वयंसेवी संस्थांद्वारे आणि धार्मिक संस्थांद्वारे राबवली जाणारी ही सेवा सामाजिक सहभाग आणि लोकसहभागाचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

लंगर सेवा ही लोकशाही मूल्यांशी सुसंगत असून समानता, बंधुता आणि सामाजिक न्याय यांना प्रोत्साहन देते. त्यामुळे सार्वजनिक धोरण निर्मितीमध्ये आणि सामाजिक विकास कार्यक्रमांमध्ये लंगर मॉडेलचा अभ्यास प्रेरणादायी ठरू शकतो.

लंगर सेवा ही शीख धर्माची एक महान देणगी असून ती मानवतेच्या समतेचे, सेवाभावाचे आणि बंधुतेचे प्रतीक आहे. ही सेवा धार्मिक, सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक अशा सर्व स्तरांवर मानवाला प्रेरणा देते. आजच्या काळात वाढती विषमता, सामाजिक तणाव आणि मानवी मूल्यांचा ऱ्हास यामुळे लंगर सेवेचा संदेश अधिकच महत्त्वाचा ठरतो.

सेवा हीच सर्वोच्च पूजा हा विचार लंगर सेवेच्या माध्यमातून संपूर्ण जगाला मिळालेला आहे. म्हणूनच लंगर सेवा ही केवळ शीख समाजाची परंपरा नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आणि अनुकरणीय आदर्श व्यवस्था आहे.

**(संजीवनी स.जाधव-पाटील)**
**सहायक संचालक (माहिती)**
**विभागीय माहित कार्यालय,**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

# राष्ट्रनिर्माते छत्रपती शिवाजी महाराज

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांनी संपूर्ण विश्वालाच आपल्या आदर्श आचार-विचाराने, कर्तृत्वाने आणि संकटावर, शत्रूवर मात करण्याच्या त्यांच्या गनिमी काव्याच्या महापराक्रमाने सर्वाना भारावून टाकलेले आहे. राष्ट्रमाता जिजाऊंच्या सुसंस्काराने घडलेल्या शिवरायांचे जीवन-चरित्र सुर्यासारखे तेजस्वी, चारित्र्यवान, समतावादी, प्रयत्नवादी, मित्तहारी, मुत्सद्दी, निर्व्यसनी, प्रेमळ, रयतेवर आईच्या मायेने प्रेम करणारे रयतेचे जाणते राजे असे होते. त्यांच्याठायी प्रचंड आत्मविश्वास, आशावाद, सर्वगुण संपन्नता, युध्द कुशलता, प्रगल्भता, बुद्धिमत्ता आणि 'शिवतंत्र' हा गणिमी कावा होता. या सगळ्या गुण वैशिष्ट्यामुळे 'शिवाजी' हे केवळ नांव न राहता ते एक सर्वव्यापी मापदंडाचे 'विश्व विद्यापीठ' झाले आहे. आपल्याला शिवचरित्र आजही प्रेरणा आणि ऊर्जा देत असते. कारण प्रतिकूल परिस्थितीवर मात करून ऐतद्देशियांचे राज्य निर्माण करणारे राष्ट्रनिर्माते छत्रपती शिवाजी महाराज जगाचे आदर्श ठरले आहे.आज लोकशाही मध्ये शिवरायांच्या राजेशाहीची आवश्यकता का वाटते? चला तर समजून घेऊ त्यांची काही रहस्य आणि कारणे...

शिवपूर्व काळ :- शिवपूर्वकाळातील यादवांची शेवटची वैभवशाली राजवट ठरली. विजयनगरचा वैभवकाळ संपल्यानंतर पुढे बहमनी राज्याचे विभाजन झाले.त्यात वऱ्हाडची इमादशाही, बिदरची बरीदशाही, विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही आणि गोवळकोंड्याची कुतुबशाही अशी त्यांची पाच शकले झाली. इकडे दिल्लीत सुलतानशाही संपुष्टात आल्यानंतर तेथे बाबराने मुघल सत्तेची स्थापना केली होती. एकूण काय तर शिवरायांच्या जन्मापूर्वी आपल्याकडे चहूबाजूने मुस्लीम शासकांच्या सत्ता अस्तित्वात होत्या. मुस्लिम राज्यकर्ते आपला राज्यकारभार मुख्यत्वे स्थानिक सुभेदार,वतनदार यांच्यामार्फत करायचे. मग जो वतन देईल त्याची हे लोकं चाकरी करायचे. बखरीमध्ये असा उल्लेख आढळतो की...

'ऐसा अंधेर कारभार बादशाही मध्ये कोणी मनास आनीत नाही. पैके पावले म्हणजे एकाचे वतन दुसऱ्यास देतील, बलदंडपणे उभी पिके कापून नेतील, बायकामुली पळवतील, कर्त्या पुरुषाचे खून करतील' यामुळे एकंदर पाहता छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माच्या आधी सर्वत्र अशी बेबंदशाही माजलेली दिसत होती. याच दरम्यान महाराष्ट्रात 'नाचू किर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी' असे म्हणत वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून संत नामदेव महाराजांनी मोठया प्रमाणात जनप्रबोधनाची चळवळ सुरु केली होती. अभंग, किर्तनातून जनमानसात जागृती करण्यासाठी संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाचा विस्तार केला. समतावादी संप्रदायाने गावा-गावातील किर्तनाद्वारे 'ज्ञाना' चा दीप लावण्याचे काम केले. प्रबोधनाचा जागर करत, जनतेवर होणा-या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी संत मंडळी जोरदार प्रयत्न करू लागले होते. संत नामदेवाच्या समतेचा ध्वज संत तुकाराम महाराज यांनी हाती घेऊन त्यावर कळस चढवला आणि आपल्या अभंगातून अन्याय-अत्याचारावर परखड भाष्य करून लोकांना जुलमी मुस्लिम राजवटी विषयी जागृत करू लागले होते. ते एका अभंगात म्हणतात...

हाती होण दावी बेना । करिता लेकीच्या धारणा ।।१।।

ऐसे धर्म जाले कळी । पुण्य पाप रंक बळी ।।२।।

सांडीले आचार । द्विज चाहाड जाले चोर ।।३।।

टिळे लपविती पातडी । लेती विचार कातडी ।।४।।

बैसोनिया तक्ता । अन्नेविण पिडीती लोका ।।५।।

तुका म्हणे देवा । काय निद्रा केली धाव आता ।।६।।

यवनांच्या जुलमी अत्याचाराने होरपळणाऱ्या जनतेला बघून तुकोबांनी विठ्ठलाकडे धावा केला. म्हणूनच की काय? राजमाता जिजाऊंच्या पोटी १९ फेब्रुवारी १६३० रोजी युगपुरुष शिवरायांचा जन्म झाला...ज्या स्वराज्याचं देखणं स्वप्न शहाजीराजे आणि जिजाऊंनी बघितले. त्या हिंदवी स्वराज्याची स्थापना करून शिवरायांनी ते स्वप्न प्रत्यक्षात साकार केले. त्यांनी रयतेला स्वातंत्र्याचा श्वास दिला. यामागे माँसाहेब जिजाऊंची प्रेरणा होती त्याच खऱ्या अर्थाने त्यांच्या गुरू होत्या. त्याच प्रमाणे शहाजीराजे यांचे नियोजन,साहस तितकेचे महत्वाचे होते. त्यांच्याविषयी जयराम पिंडे 'राधामाधवविलासचंपू' या काव्यात लिहतात...

ससि वो रवि पूरब पश्चिम लों । तुम सोय रहो सिरसिंधू महा

अरू उत्तर दछन रछन को इत । साहजू है उत साहिजहां

याचा अर्थ पूर्व व पश्चिमेला सूर्य चंद्र आहेत,तुम्ही निश्चिंत रहा. कारण उत्तरेचे रक्षण करण्यास शाहाजहान व दक्षिणेचे रक्षण करण्यास शाहजी समर्थ आहे. यावरून शहाजीराजे यांचा दक्षिणेत असलेला प्रचंड दरारा आणि त्यांची स्वतंत्र राज्य करण्याची प्रबळ इच्छा दिसून येते. तसेच संस्कार शिवरायांवर झाले होते. म्हणून शिवराय जन्म घेत नसतात, तर ते संस्काराने घडवावे लागतात. जिजाऊंनी शिवबांना कसे घडविले, कसे शिक्षण दिले, काय संस्कार केले? या विषयी 'शिवभारत' मध्ये शिवकालीन कवी परमानंद लिहतात...

अख्याती लिखितु यादवाचार्यो वर्णमदिमंम ।

तावद द्वितीयमप्येष विलिख्य ते तमदर्शन ते ।।

म्हणजे जिजाऊंनी पहिले अक्षर लिहिण्यास सांगितल्या बरोबर बालशिवबांनी पहिले लिहून दुसरे अक्षर देखील लिहून दाखविले अशा प्रकारे शिवबांची शिक्षणा मध्ये प्रगती होती. त्यामुळेच ते श्रृती, स्मृती, पुराणे, दंडनीती, समस्त शास्त्रे, काव्य, रामायण, महाभारत, व्यायाम, वास्तुविद्या, ग्रहनक्षत्रांच्या स्थिती व वेळा यांचे शास्त्र, गणित शास्त्र, नितीशास्त्र, धनुर्वेदाची चिकित्सा, सामुद्रिक मत, विविध भाषा, अनेक छंद, वृत्त, सुभाषित, गज-रथ-अश्व याच्यावर स्वार होणे आणि त्यांची लक्षणेही जाणणे, चढणे, ओलांडणे, फिरणे,उडी मारणे या विद्यामध्ये ते प्रविण झाले. तसेच तलवार, धनुष्य, चक्र, भाला, पट्टा हे शस्त्र चालवणे शिकले. युद्ध, द्वंदयुद्ध, किल्ल्यांना अधिक दुर्गम बनविण्याची कामे, दुर्गम ठीकाणी घुसण्याची तंत्रे, इंगिते, माया, विषाचा अपाय दूर करण्याच्या विद्या, विविध रत्नांची परीक्षा, अवधान आणि विविध लिपी या मध्येही ते पारंगत होते. जिजाऊंनी सुसंस्काराने घडवलेले महान राजा छत्रपती शिवराय महाराष्ट्राला मिळाले.त्यामुळे आम्हां भारतीयावर त्या थोर माऊलीचे खूप मोठे उपकार आहेत. त्यांनी प्रसंगी शस्त्र हाती घेतले, संकटसमयी स्वराज्याच्या कारभाराची धुरा सांभाळली, न्यायदानाचे पवित्र कार्य केले. आयुष्याच्या शेवटपर्यंत छत्रपती शिवरायांवर मायेचं छत्र धरलं होतं. रायगडावरील ६ जून १६७४ रोजीचा दैदीप्यमान, ऐतिहासिक, नेत्रदीपक राज्याभिषेक सोहळा झाल्यावरच त्यांनी देहत्याग केला. रियासतकार गो. स. सरदेसाई जिजाऊ बद्दल म्हणतात... तत्कालीन ऐतिहासिक व्यक्तीस राष्ट्रीय स्वत्व दिमाखाने मिरवणा-या शहाजी शिवाय दुसरा एकही हिंदू सत्ताधीश दक्षिणेत आढळत नाही. म्हणून शिवाजीला जन्म देऊन त्याचे ठिकाणी स्वातंत्र्याचे वारे उत्पन्न करण्याचे श्रेय त्यांना आवश्य मिळते

हिंदवी स्वराज्य स्थापना :- आदिलशाहाचा सरदार मुरारजगदेवराव याने पुण्याला उद्ध्वस्त करून तेथे गाढवाचा नांगर फिरवला. त्या जमिनीत पहार रोवली पहारीला फुटकी कवडी, तुटलेली चप्पल, फाटके वस्त्र गुंडाळले आणि नगरभर दवंडी देऊन द्वाही फिरवली की, जो कुणी येथे वस्ती करेल, शेती कसेल त्याचा निर्वंश होईल...जिजाऊ मात्र असल्या खुळचट कल्पनांना भिक घालणा-या पैकी नव्हत्या त्यांनी ती पहार उपटून फेकली आणि शिवबांच्या हाती सोन्याचा नांगर देऊन ती शापित भूमी नांगरून गरजेच.

**-रमेश काकासाहेब शिंदे**
(छत्रपती संभाजीनगर) मो.९४२२९७०८९६

# सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान ; मधुबाला

आज १४ फेब्रुवारी, बॉलिवूडची मर्लिन मनरो, सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान, चित्रपट सृष्टीतीलच नव्हे तर भारतातील सर्वात सुंदर महिला असे जीचे वर्णन केले जाते त्या मधुबाला यांचा आज जन्मदिन. आज त्यांची ९३ वि जयंती. १४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीच्या एका पश्तून कुटुंबात जन्मलेल्या मधुबाला यांचे मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी. असे म्हणतात की मधुबाला यांच्या जन्मानंतर एका व्यक्तीने तिच्या बाबत असे भविष्य वर्तवले होते की ती तिच्या आयुष्यात खूप ख्याती मिळवेल. पैसा अडका, धन संपत्ती मिळवेल पण तिचे आयुष्य अतिशय दुःखी असेल. या भविष्यावर विश्वास ठेवून तिचे वडील तिला मुंबईला घेऊन आले. वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९४२ साली मधुबाला यांनी बेबी मुमताज या नावाने चित्रपटात भूमिका करण्यास सुरुवात केली. बाबुराव पटेल आणि डॉ सुशीलाराणी पटेल या दाम्पत्याचा मधुबाला वर विशेष लोभ होता त्यांनीच तिला मधुबाला हे नाव दिले. बालवयातच चित्रपटात काम करू लागल्याने मधुबाला या शाळेत जाऊ शकल्या नाहीत त्यामुळे त्यांना इंग्रजी येत नसे मात्र उर्दू भाषा येत होती. चित्रपटात भूमिका करण्यास सुरवात केल्यावर मात्र तिने इंग्रजीवर चांगले प्रभुत्व मिळवले. तिचे वडील कडक शिस्तीचे असल्याने ती कधीही चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहत नसे. १९४७ साली आलेल्या निलकमल या चित्रपटात ती पहिल्यांदा अभिनेत्री म्हणून झळकली. याच वर्षी तिचा आणखी एक चित्रपट रिलीज झाला. पुढच्या वर्षी म्हणजे १९४८ साली तिचा अमर प्रेम नावाचा चित्रपट आला या सर्व चित्रपटात राज कपूर हे तिचे नायक होते. यानंतर बॉम्बे टॉकीजचा महल नावाचा चित्रपट आला हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरला. यानंतर मात्र मधुबाला यांनी मागे वळून पाहिले नाही. अशोक कुमार, दिलीपकुमार, देवानंद या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांसह तिने भूमिका केल्या. अल्पावधीतच त्या बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. त्यांनी आपल्या करियरमध्ये ६६ चित्रपटात भूमिका केल्या. बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार दिलीपकुमार यांच्यावर त्या एकतर्फी प्रेम करत असत. मुघले आझम चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान त्यांनी दिलीपकुमार यांच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखवली मात्र दिलीपकुमार यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर त्यांनी गायक किशोरकुमार यांच्याशी विवाह केला. मधुबाला या किशोरकुमार यांच्या चौथ्या पत्नी होत्या. किशोरकुमार यांच्या बरोबरचे लग्न ही बाब दोघांसाठी कसेतरी जगण्यासाठी केलेली तडजोड होती त्यामुळेच दोघांचे जास्त पटत नसे. मधुबाला यांना हृदय रोग होता आणि १९५० पासून त्यांच्यावर उपचार चालू होते. पण तिने ही गोष्ट सर्वांपासून लपवून ठेवली होती. तिची तब्येत बरी नसतानाही त्यांनी निर्माते दिग्दर्शकांचे नुकसान होऊ नये म्हणून साइन केलेले चित्रपट पूर्ण केले. या चित्रपटात असे कोठेही जाणवत नव्हते की त्या आजारी आहेत. हृदय रोगासोबत त्यांना असा एक आजार होता की ज्या आजाराने शरीरात प्रमाणापेक्षा अधिक रक्त तयार होत असे व तिच्या नाकातून व तोंडातून रक्तस्त्राव होत असे. इतक्या दुर्धर आजारातही तिने चित्रपटात काम करणे सुरूच ठेवले. मुघले आझम या चित्रपटातील एका दृश्यात तिला दोरखंडाने बांधले होते पण तिने तब्येत बरी नसतानाही ते सहन केले. ती म्हणायची अनारकलीची भूमिका करण्याची संधी पुन्हा मिळणार नाही. ती इतकी प्रोफेशनल होती की आपले काम अतिशय तन्मयतेने करत असत. प्रसंगी जेवण झाले नाही तरी चालेल, थर्ड क्लासने प्रवास करावा लागला तरी चालेल पण काम वेळेच्या वेळी पूर्ण करण्याचा तिचा आग्रह असे. तिच्या याच कामाच्या निष्ठेमुळे ती महान अभिनेत्री बनली. अमेरिकेच्या थिएटर आर्टस या जगप्रसिद्ध मासिकेने तिचा जगातील सर्वात मोठी अभिनेत्री म्हणून गौरव केला होता. तिच्या सौंदर्याची जादूच अशी होती की बघणारा हरखून जायचा. पण हेच आरस्पानी सौंदर्य तिच्यासाठी मात्र शापित ठरले. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. २३ फेब्रुवारी १९६९ साली त्यांनी जगाचा निरोप घेतला. मधुबालाला व्हीनस ऑफ स्क्रीन असे म्हटले जाते मात्र तिच्या याच आरस्पानी सौंदर्याला अल्पायुष्याचा शाप होता. आज त्या जाऊन ५७ वर्ष झाले मात्र तिच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू आजही कायम आहे. सौंदर्याची खाण बॉलिवूडची शान असलेल्या मधुबाला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# मालमत्ता विकली तरी पत्नीचा पोटगीचा हक्क कायम; केरळ उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

**आत्ताच एक्सप्रेस**

**कोची/वृत्तसेवा/**पतीच्या मालमत्तेचे हस्तांतरण झाले तरी त्या मालमत्तेतून पोटगी मिळवण्याचा हिंदू पत्नीचा अधिकार अबाधित राहतो, असा महत्त्वपूर्ण निकाल केरळ उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठाने दिला आहे. न्यायमूर्ती सुश्रुत धर्माधिकारी, पी.व्ही. कुन्हीकृष्णन आणि जी. गिरीश यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, जर पोटगीची कायदेशीर प्रक्रिया सुरू असताना मालमत्ता विकली गेली असेल, तर खरेदीदाराला त्या दाव्याची माहिती होती असेच मानले जाईल.




कायद्याचे संरक्षण:

न्यायालयाने 'मालमत्ता हस्तांतरण कायदा, १८८२' चे कलम ३९ आणि 'हिंदू दत्तक व देखभाल कायदा, १९५६' चे कलम २८ चा आधार घेत हा निर्णय दिला. न्यायालयाच्या मते, पत्नीचा पोटगीचा हक्क विवाहापासून सुप्त असतो, दाव्याने तो सक्रिय होतो आणि न्यायालयाच्या निर्णयाने तो मालमत्तेवर 'भार' म्हणून प्रस्थापित होतो.

तज्ज्ञांचे मत:

या निकालावर भाष्य करताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश धनावत यांनी सांगितले की, हा निकाल महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने ऐतिहासिक आहे. पोटगी टाळण्यासाठी मालमत्ता विकणाऱ्या पतींना आता चाप बसेल. त्यांनी असेही आवाहन केले की, मालमत्ता खरेदीदारांनी आता अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. खरेदीपूर्वी विक्रेत्याचे वैवाहिक वाद किंवा न्यायालयीन खटले तपासूनच व्यवहार करावा, अन्यथा खरेदी केलेली मालमत्ता जप्त होऊ शकते.

या निकालामुळे 'विजयन विरुद्ध शोभना' (२००७) या प्रकरणातील जुना निर्णय बदलला असून, आता पत्नीचा हक्क केवळ पतीपुरता मर्यादित न राहता त्याच्या मालमत्तेपर्यंत विस्तारला आहे.

# शाश्वत विकासातूनच मानवाची समृद्धी शक्य-डॉ. सोनाजी पतंगे

## पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालयात ३८ व्या राष्ट्रीय अर्थशास्त्र परिषदेचे दिमाखात उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**पाचोड (प्रतिनिधी)** उदारीकरणाच्या युगात कृषी क्षेत्रापुढील आव्हाने अधिक तीव्र झाली आहेत.अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवून शेतीचा शाश्वत विकास साधणे ही काळाची गरज आहे. जेव्हा आपण शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारू, तेव्हाच खऱ्या अर्थाने मानवाची समृद्धी होईल, असे प्रतिपादन डॉ. सोनाजी पतंगे यांनी केले.पाचोड येथील शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'पीएम उषा सॉफ्ट कॉम्पोनंट' आणि 'अर्थशास्त्र विभाग' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३८ व्या दोन दिवसीय राष्ट्रीय अर्थशास्त्र परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.या परिषदेचे उद्घाटन डॉ. भारत खंदारे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून संस्थेचे संचालक तथा जिल्हा परिषद सदस्य शिवराज भैय्या भुमरे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्या डॉ. योगिता होके पाटील यांची उपस्थिती होती. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी या भव्य परिषदेचे नियोजन केले.

**सिंचन व्यवस्था आणि जागतिक अर्थव्यवस्था**

स्वागताध्यक्ष शिवराज भैय्या भुमरे यांनी आपल्या भाषणात भारताच्या वाढत्या आर्थिक शक्तीवर प्रकाश टाकला. ते म्हणाले भारत आज जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. कृषी विकासासाठी केवळ धोरणे पुरेशी नसून, मोठ्या प्रमाणावर सिंचन व्यवस्था उभारणे आवश्यक आहे.अमेरिकेने भारतावर लादलेला 'टॅरिफ' नुकताच मागे घेतल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला मोठी उभारी मिळेल.

**अर्थतज्ज्ञांनी केवळ चर्चा न करता शासनाला धोरण निर्मितीत ठोस आणि अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करावे.**

मराठवाडा अर्थशास्त्र परिषदेचे संयोजन डॉ. शिवाजी यादव यांनी केले. या दोन दिवसीय परिषदेत अर्थशास्त्रातील समकालीन विषय, शेतीचे प्रश्न आणि जागतिक आर्थिक बदल यावर सखोल चर्चा होणार आहे. यामुळे संशोधक



आणि विद्यार्थ्यांना अर्थशास्त्राच्या नव्या दिशा समजण्यास मदत होईल.या कार्यक्रमास कार्याध्यक्ष डॉ. अर्जुन मोरे, सचिव डॉ. विश्वनाथ कोकर, पीएम उषा समन्वयक प्रा. संदीप सातोणकर, डॉ. साहेबराव खंदारे, डॉ. दिलीप अर्जुने यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ह. सो. बिडवे यांनी केले, तर आभार डॉ. शिवाजी यादव यांनी मानले. परिषदेच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुरेश नलावडे, डॉ. संतोष चव्हाण, डॉ. विलास महाजन, डॉ. सुभाष पोटभरे, डॉ. भगवान जायभाय, डॉ. तुकाराम गावंडे, प्रा. विनोद कांबळे यांसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## संक्षिप्त

### बिडकीन पोलिसांची धडाकेबाज कारवाई

### चाकूचा धाक दाखवून लुटणाऱ्या टोळीला २४ तासांत ठोकल्या बेड्या



**आत्ताच एक्सप्रेस**

**बिडकीन (प्रतिनिधी)**चितेगाव परिसरात चाकूचा धाक दाखवून तरुणाला मारहाण करत लुटणाऱ्या तीन सराईत गुन्हेगारांना बिडकीन पोलिसांनी अवघ्या २४ तासांत जेरबंद केले आहे. पोलिसांच्या या वेगवान कारवाईमुळे परिसरात गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे रात्री ९:३० ते ९:४५ च्या सुमारास चितेगाव येथे लघवीसाठी थांबले होते. यावेळी स्प्लेंडर मोटरसायकलवरून आलेल्या तीन अनोळखी इसमांनी त्यांच्या पोटाला चाकू लावून त्यांना धमकावले. आरोपींनी फिर्यादीची कॉलर पकडून त्यांना अजिंठा फार्मा कंपनीच्या पाठीमागे असलेल्या मोकळ्या जागेत नेले. तिथे त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यात आली.

आरोपींनी केवळ ऐवज लुटला नाही, तर फिर्यादीचा १५,००० रुपयांचा मोबाईल हिसकावून घेतला. इतकेच नव्हे तर, चाकूचा धाक दाखवून त्यांच्या 'फोन पे' (झहेपशझश) चा पासवर्ड बळजबरीने मिळवला आणि खात्यातील ७,२८२ रुपये स्वतःच्या खात्यावर वळवून घेतले.

याप्रकरणी बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ९१/२०२६, भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ च्या कलम ३०९ (६), ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी तपासाची चक्रे फिरवत पोलीस उपनिरीक्षक मनोज पाटील यांच्याकडे तपास सोपवला.

तपासादरम्यान, आरोपी चितेगाव येथील 'भूत बंगला' परिसरात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १०:३० च्या सुमारास पोलिसांनी परिसरात सापळा रचला. पोलिसांची चाहूल लागताच अंधाराचा फायदा घेऊन आरोपींनी पळ काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी सुमारे दीड ते दोन किलोमीटर पाठलाग करून तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले.

ही कारवाई बिडकीन पोलीस ठाण्याचे ए.पी.आय. निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एस.आय. मनोज पाटील, हेड कॉन्स्टेबल अजिनाथ शेकडे, गणेश खंडागळे, संजय चव्हाण आणि राजू चव्हाण यांच्या पथकाने केली.

# सोयगाव तालुक्यात भाजपचा विजयाचा गुलाल; फर्दापूर गटासह सावळदबारा, फर्दापूर गणात कमळ फुलले

**आत्ताच एक्सप्रेस**

**सावळदबारा (प्रतिनिधी)** नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सोयगाव तालुक्यातील भारतीय जनता पार्टीने जोरदार मुसंडी मारली आहे. फर्दापूर जिल्हा परिषद गटासह सावळदबारा आणि फर्दापूर पंचायत समिती गणात भाजपच्या उमेदवारांनी विजय संपादन करत विरोधकांना धूळ चारली आहे. या विजयामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून ठिकठिकाणी जल्लोष साजरा केला जात आहे.

**जिल्हा परिषद गट (फर्दापूर): माहीन इद्रिस मुलतानी,पंचायत समिती गण (सावळदबारा): उत्तम चव्हाण,पंचायत समिती गण (फर्दापूर): राहुल**

निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या संपर्क कार्यालयात विजयी उमेदवारांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांची विशेष उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते विजयी उमेदवारांचा पुष्पहार घालून आणि पेढे भरवून गौरव करण्यात आला.

या सत्कार समारंभाप्रसंगी भाजपचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात प्रामुख्याने:




सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते, प्रमोद पाटील, नारायण कोलते, मनोज बुढाळ, भावराव कोलते, देव आप्पा पंधाडे, एकनाथ सपाटे, संजय राजपूत, रहिम पठाण, पंढरी साबळे, बेलआप्पा पंधाडे, नेमीचंद जाधव, शरीफ तडवी, सिताराम जाधव, गजानन गट, संभाजी पवार, दिपक मानकर, विनोद टिकारे, योगेश साळुंखे, सुनिल शिपल्कर, ज्ञानेश्वर काळे, ईश्वर भुसारे व इतर कार्यकर्त्यांचा समावेश होता.हा विजय म्हणजे तळागाळातील कार्यकर्त्यांनी घेतलेल्या कष्टाचे आणि जनतेने भाजपच्या ध्येयधोरणांवर दाखवलेल्या विश्वासाचे फळ आहे, अशी भावना यावेळी नेत्यांनी व्यक्त केली.

## मिनी मंत्रालयासाठी उमेदवार पान १ वरून..

**'लक्ष्मी दर्शना'चा अट्टहास नडला**

ग्रामीण भागातील निवडणुकीत आता केवळ कामाच्या जोरावर मते मिळवणे कठीण झाले आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी:

**रंगीत-संगीत पार्ट्या:** दररोज रात्री होणाऱ्या जेवणावळी आणि पार्ट्यांवर लाखोंचा धूर उडाला.**लक्ष्मी दर्शन:** मतदानाच्या आदल्या रात्री होणारे 'अर्थपूर्ण' वाटप उमेदवारांच्या अंगाशी आले आहे.

**कार्यकर्त्यांचा 'फुस' लावणारा सल्ला:** भाऊ, तुम्हीच निवडून येणार, फक्त खर्च करा, असे म्हणणाऱ्या कार्यकर्त्यांनी उमेदवारांना कर्जाच्या खाईत लोटले आहे.

**पत्नीला उभे करण्यासाठी जमीन विकली!**

निवडणुकीतील एक धक्कादायक किस्सा समोर आला आहे. एका कार्यकर्त्याने आपल्या पत्नीला निवडणूक रिंगणात उतरवण्यासाठी स्वतःची जमीन करारावर देऊन लाखो रुपये उभे केले. निवडून आल्यावर सर्व काही सुरळीत होईल, या आशेवर असलेल्या या उमेदवाराचा आता भ्रमनिरास झाला असून, कर्जाचे डोंगर आणि सावकाराचा ससेमिरा मागे लागल्याने कुटुंब संकटात सापडले आहे.

**निकालानंतरचे वास्तव 'चविष्ट' पण दाहक**

निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर आता गल्लीबोळात या खर्चाच्या 'चविष्ट' चर्चा रंगत आहेत. कोण किती कर्जात आहे, कोणाची जमीन सावकाराने ताब्यात घेतली, याच्या सुरस कथा ऐकायला मिळत आहेत. सत्ता मिळाली नाही आणि संपत्तीही राहिली नाही, अशी अवस्था अनेक 'हौसे, नवसे आणि गौसे' उमेदवारांची झाली आहे.**थोडक्यात सांगायचे तर:** राजकारणातील ही चुरस आता अनेकांसाठी वैयक्तिक आयुष्याची मोठी आपत्ती ठरली आहे. सत्तेच्या खुर्चीसाठी घेतलेले हे कर्ज फेडताना आता अनेकांच्या डोळ्यात पाणी येत आहे.

## पैठण येथील प्राचीन महादेवांच्या मंदिरामध्ये दर्शन घेण्यासाठी महाशिवरात्री पर्वावर भाविकांची गर्दी!

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/प्रतिनिधी**/दक्षिण काशीतील पैठण येथील सिद्धेश्वरी तीर्थावलीवर दिनांक १५ रविवारी संत ज्ञानेश्वर महाराजांनी सुरू केलेल्या शिवरात्री महोत्सवाला यंदा ७३८ वर्ष पूर्ण झाली आहे. शिवरात्रीच्या महापर्वावर मराठवाड्याच्या काण्याकोपऱ्यातून रूढी, परंपरा व प्रथेनुसार ब्रह्मदेवाने स्थापित केलेल्या शिवलिंग पिंडीचे दर्शन घेण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने लोटला होता. संत ज्ञानेश्वराने शुद्धिपत्र मिळाल्यानंतर सिद्धेश्वर तीर्थावळीवर १२८७ ला दोन वर्ष आठ महिने मुक्काम ठेवला होता.



तेव्हापासून सिद्धेश्वर तीर्थवली वर महाशिवरात्री पर्वावर यात्रा भरू लागली. सिद्धेश्वर महादेव भक्त व भाविकांच्या पुढाकाराने सिद्धेश्वर तीर्थावळीचा विकास होत आहे. पैठण ही भूमी अतिशय प्राचीन असून या शहरात अनेक प्राचीन महादेवाची मंदिरे आहेत. , गाढेश्वर, दोलेश्वर, गंगेश्वर, सोमेश्वर,गोदेश्वर, पिंपळेश्वर हरहरेश्वर, कलिकेश्वर, रामेश्वर, तारकेश्वर, इंद्रेश्वर नागेश्वर व बाळलिंगेश्वर आदि महादेवांच्या दर्शनासाठी शिवरात्री पर्वावर भाविकांनी गर्दी केली होती. जैनपुरा पैठण येथे व गोदाकाठच्या रामतीर्थावर व पिंपळेश्वर तीर्थावलीवर ही सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. गोदावरीवरील ३२ तीर्थावळीं चे एकच मंदिर उभे करण्यासाठी श्री संत एकनाथ महाराज विश्वस्त मंडळांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी भक्तांनी केली आहे. सिद्धेश्वराच्या महादेवाची पिंड गोदावरीच्या पात्रात आहे पायऱ्या उतरून भाविकांना दर्शन घ्यावे लागते.परदेशीपुरा येथील महिला मंडळाच्या वतीने शिव अमृत पारायण व महादेव भक्तीकथा संपन्न झाली.



## महाशिवरात्रीचा उत्साह: अमृतसर मंदिर आणि बर्डीच्या महादेवाला भाविकांची मांदियाळी; १०८ होम पूजेने परिसर भक्तीमय

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** देशभरात महाशिवरात्रीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने अवघा आसमंत दुमदुमून गेला असून, अमृतसर येथील सुप्रसिद्ध शिव मंदिर आणि बर्डी येथील महादेव मंदिर या ठिकाणी भाविकांनी दर्शनासाठी पहाटेपासूनच लांबच लांब रांगा लावल्या होत्या.

अमृतसर येथील शिव मंदिरात आज सकाळपासूनच भाविकांचे लोंढे पाहायला मिळाले. मंदिराला आकर्षक फुलांची सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आली असून, भाविकांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने महादेवाचे दर्शन घेतले.

बर्डी येथील महादेव मंदिर परिसरात आज विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणचे मुख्य आकर्षण म्हणजे '१०८ होम पूजा'. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या भाविकांनी या होम पूजेमध्ये सहभाग नोंदवला. मंत्रोपचार आणि अग्नीच्या साक्षीने झालेल्या या पूजेमुळे संपूर्ण परिसरातील वातावरण भक्तीमय आणि चैतन्यदायी झाले होते.

वर्षातून एकदा येणाऱ्या या मोठ्या पर्वाचे औचित्य साधून अबालवृद्धांनी दर्शनाचा लाभ घेतला. महादेवाच्या दर्शनाने मनाला शांती मिळते, अशी भावना अनेक भाविकांनी व्यक्त केली. गर्दीचे नियोजन करण्यासाठी मंदिर प्रशासन आणि स्थानिक स्वयंसेवकांनी चोख व्यवस्था ठेवली होती, ज्यामुळे भाविकांना सुलभ दर्शन घेता आले.दिवसभर चाललेल्या या सोहळ्यात अभिषेक, आरती आणि प्रसादाचे वाटप करण्यात आले. किरण खानापुरे यांनी टिपलेल्या छायाचित्रांमधून या उत्सवाचा भव्यपणा स्पष्टपणे दिसून येत आहे.



# नादरपूर येथे महाशिवरात्रीला बसणार छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा; ग्रामसभेत झाला महत्त्वपूर्ण निर्णय

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** कन्नड तालुक्यातील नादरपूर येथे महाशिवरात्रीच्या शुभ मुहूर्तावर आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा बसविण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. श्रीयुत विठ्ठल रखमाजी निकम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामस्थांच्या बैठकीत हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रारंभी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार साहेब यांच्या अपघाती निधनाबद्दल, तसेच गावातील तरुण युवक ज्ञानेश्वर हरिश्चंद्र जाधव यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त करण्यात आला. उपस्थित सर्वांनी उभे राहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या बैठकीत सत्कार समारंभही पार पडला. पिशोर जिल्हा परिषद गटातून 'कैलास महर्षी रायभान जाधव विकास आघाडी'चे उमेदवार संजय भिकनराव निकम (आबा) यांनी अटीतटीच्या लढतीत झुंज दिली, तर पिशोर पंचायत समिती गणातून श्रीमती कैकशा युसूफखां पठाण यांनी विजय संपादन केला. या विजयाबद्दल



ग्रामपंचायत व नादरपूर ग्रामस्थांच्या वतीने दोघांचाही यथोचित सत्कार करण्यात आला.

पुतळ्यासाठी दातृत्वाचा ओघ: लाखांची मदत जाहीर

शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या उभारणीसाठी ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे आर्थिक मदतीचा हात पुढे केला आहे.संजय आबा निकम: १ लाख १ हजार रुपये,श्रीमती कैकशा युसूफ पठाण: ५१ हजार रुपये,गावातील काही प्रतिष्ठित व्यक्तींनी प्रत्येकी ५१ हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले आहे.तसेच, लोकवर्गणीतून गावातील प्रत्येक उमटा (कुटुंब) ५ हजार रुपयांचे योगदान देणार असल्याचे बैठकीत ठरले.या प्रसंगी संजय आबा निकम व नवनिर्वाचित सदस्य कैकशा पठाण यांनी आपले मनोगत व्यक्त करताना गावाच्या विकासासाठी व शिवस्मारकासाठी सदैव कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सरपंच लक्ष्मण बळी यांनी केले, तर आभार प्रदर्शन जिल्हा प्रशासकीय अधिकारी (छत्रपती संभाजीनगर) तथा माजी सरपंच पती श्री. दिलीप निकम साहेब यांनी मानले.या बैठकीला ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्त समिती अध्यक्ष, पोलीस पाटील आणि नादरपूर गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## समृद्धी महामार्गाचा 'कनेक्ट':

# छत्रपती संभाजीनगरकरांची पसंती आता इगतपुरीला; 'सेकंड होम'साठी गुंतवणुकीचा ओघ वाढला

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** निसर्गरम्य वातावरण, सह्याद्रीच्या रांगा आणि वर्षभर लाभणारे आल्हाददायक हवामान यामुळे नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी शहर आता छत्रपती संभाजीनगरच्या नागरिकांसाठी वास्तव्याचे केंद्र बनत आहे.

विशेषतः हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गामुळे या दोन्ही शहरांतील अंतर अवघ्या काही तासांवर आल्याने, इगतपुरीच्या रिअल इस्टेट क्षेत्रात संभाजीनगर आणि जालना पट्ट्यातील नागरिकांकडून मोठी पसंती मिळत आहे.

समृद्धी महामार्ग: घरांच्या स्वप्नांना नवा 'हायवे'

समृद्धी महामार्गामुळे कनेक्टिव्हिटी कमालीची सुधारली आहे. पूर्वी इगतपुरीला जाण्यासाठी लागणारा वेळ आता निम्म्यावर आल्याने, 'वीकेंड होम' किंवा 'सेकंड होम' शोधणाऱ्या संभाजीनगरकरांसाठी इगतपुरी हा पहिला पर्याय ठरत आहे.

मुंबई आणि ठाण्यातील गुंतवणूकदारांप्रमाणेच आता मराठवाड्यातील नागरिकही येथील निसर्गसौंदर्य आणि तुलनेने परवडणाऱ्या घरांच्या किमतींकडे आकर्षित होत आहेत.

**'होलिस्टिक लिव्हिंग' आणि 'अर्थ वन' प्रकल्पाचे आकर्षण**

इगतपुरीतील घोटी परिसरात त्र्यंबकेश्वरच्या सानिध्यात 'होलिस्टिक लिव्हिंग' (आरोग्याभिमुख जीवनशैली) ही नवी संकल्पना रुजत आहे. रुंगटा ग्रुप आणि युनायटेड बिल्डर्स यांचा संयुक्त प्रकल्प असलेला 'अर्थ वन' यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. विशेष म्हणजे, जागतिक ख्यातीचे हेल्थ गुरू डॉ. मिकी मेहता हे या प्रकल्पाचे ब्रँड ॲम्बेसेडर असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली येथे राहणाऱ्यांना केवळ घरच नव्हे, तर आरोग्यदायी जीवनशैली मिळणार आहे.

इगतपुरीची नैसर्गिक ऊर्जा विलक्षण आहे. इथली शुद्ध हवा आणि निसर्गाशी असलेले नाते माणसाला शारीरिक व आध्यात्मिकदृष्ट्या पुनरुज्जीवित करते. 'अर्थ वन' हा केवळ प्रकल्प नसून तो निसर्ग आणि आधुनिकतेचा मेळ घालणारा 'वेलनेस हब' आहे.


**- डॉ. मिकी मेहता (हेल्थ गुरू)**

का ठरतेय इगतपुरी पसंतीचे केंद्र?

इगतपुरीच्या वाढत्या लोकप्रियतेमागे काही प्रमुख कारणे आहेत:

सह्याद्रीच्या कुशीत वसलेले हिल स्टेशन आणि धुक्यांची चादर.

धार्मिक जवळीक: त्र्यंबकेश्वर आणि इतर अध्यात्मिक केंद्रांचे सानिध्य.समृद्धी महामार्गामुळे छत्रपती संभाजीनगरहून सहज ये-जा शक्य.



वेगाने विकसित होणारे पर्यटन आणि पायाभूत सुविधा.युनायटेड ग्रुपचे ललित रुंगटा यांनी या ट्रेंडबाबत माहिती देताना सांगितले की, छत्रपती संभाजीनगर आणि जालना पट्ट्यातील नागरिक निसर्गाच्या सानिध्यात घर शोधत आहेत. त्यांच्या गरजा लक्षात घेऊनच आम्ही हा प्रकल्प साकारला आहे. येथे केवळ जमीन किंवा घर न मिळता, एक संपूर्ण 'कम्युनिटी लिव्हिंग'चा अनुभव मिळणार आहे.

एकूणच, निसर्गसौंदर्य आणि आधुनिक सोयीसुविधा यांच्या संगमामुळे इगतपुरी आता खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे 'प्रॉपर्टी हब' म्हणून नावारूपास येत आहे.

## संक्षिप्त

### जालन्यातील ज्येष्ठ तबलावादक संदीप कांबळे यांचे अल्पशा आजाराने निधन; कलाक्षेत्रावर शोककळा



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ जालना येथील नुतन वसाहात भागातील रहिवासी आणि प्रसिद्ध तबलावादक संदीप बिभीषण कांबळे (वय ४६) यांचे रविवारी पहाटे ४ च्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने कांबळे कुटुंबासह जालन्यातील कला आणि सांस्कृतिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

**अंत्यसंस्कार पार पडले**

संदीप कांबळे यांच्या निधनानंतर शहरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. रविवारी दुपारी जे.ई.एस. कॉलेजच्या पाठीमागे असलेल्या ख्रिश्चन स्मशानभूमीमध्ये त्यांच्यावर अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील विविध स्तरांतील नागरिक, कलाकार आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एक अष्टपैलू आणि प्रेमळ व्यक्तिमत्व स्व. संदीप कांबळे हे केवळ एक उत्कृष्ट तबलावादकच नव्हते, तर ते अत्यंत प्रेमळ आणि मनमिळावू स्वभावाचे होते. 'सर्वांच्या मदतीला धावून जाणारे व्यक्तिमत्व' अशी त्यांची ओळख होती. संगीताप्रती असलेली त्यांची निष्ठा आणि वाद्यावरची पकड यामुळे त्यांनी अनेकांची मने जिंकली होती. त्यांच्या जाण्याने एक उमदा कलाकार आणि सच्चा माणूस हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. परिवार- त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, आई-वडील, दोन भाऊ आणि एक बहीण असा मोठा परिवार आहे. कांबळे कुटुंबाच्या या दुःखात सर्वजण सहभागी असून, संदीपजींच्या आठवणींना उजाळा दिला जात आहे.

# प्रशिक्षित नगरसेवकांनो, खुर्ची उबवणे सोडा आणि कर्तव्य बजावा!

## मुंबई उच्च न्यायालयाच्या चपराकनंतर तरी जालन्यातील प्रशासन 'क्शन मोड'मध्ये येणार का?

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ मुंबईच्या पॉश हिरानंदानी परिसरात अतिक्रमणधारकांशी 'टॉम अँड जेरी'चा खेळ खेळणाऱ्या मुंबई महानगरपालिकेचे वाभाडे काढत मुंबई उच्च न्यायालयाने प्रशासनाला जमिनीवर आणले आहे. प्रशासन हतबल झाले आहे का? तुम्ही शहराला अतिक्रमणधारकांच्या हवाली केले आहे का? अशा शब्दांत न्यायालयाने फटकारले असतानाच, आता हाच प्रश्न जालना प्रशासन आणि येथील 'प्रशिक्षित' नगरसेवकांना विचारण्याची वेळ आली आहे.

मुंबईतील रस्त्यांवर शाळांच्या बाहेर झालेल्या अतिक्रमणामुळे चिमुकल्यांचा जीव धोक्यात आहे, तर जालन्यातही परिस्थिती काही वेगळी नाही. शहरातील मुख्य रस्ते, शाळा-महाविद्यालयांचे परिसर आणि पदपथ हे जणू अतिक्रमणधारकांच्या मालकीचे झाले आहेत की काय, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

**न्यायालयाचे ताशेरे: लांगूलचालन की कर्तव्यात कसूर?**

न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठाने प्रशासनाच्या 'लाचारी'वर बोट ठेवले आहे. अतिक्रमण काढायला गेल्यावर अधिकारी मार खातात किंवा 'धार्मिक भावना' आडव्या येतात, ही कारणे आता चालणार नाहीत. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, प्रशासन जनतेच्या पैशातून अतिक्रमणधारकांना फिरते शौचालय आणि पाणी पुरवून त्यांना प्रोत्साहन देत आहे.

फिरते शौचालय हटवता येत नसेल, तर संबंधित अधिकाऱ्याची पदावनती (Demotion) करा! हा न्यायालयाचा इशारा जालन्यातील त्या सुस्त अधिकाऱ्यांसाठीही लागू होतो, जे अतिक्रमणांकडे डोळेझाक करून एसी केबिनमध्ये बसून राहतात.

**जालन्यात जिल्हाधिकाऱ्यांकडेच सूत्रे; मग कारवाई का रखडली?**

नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धनावत यांनी जालन्यातील विदारक स्थितीवर थेट भाष्य केले आहे. जालन्याचे वैशिष्ट्य म्हणजे येथील महानगरपालिका आयुक्त या स्वतः जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी सुद्धा आहेत.

**दुहेरी अधिकार असूनही कारवाई शून्य का?**

**प्रशासनाला न्यायालयाच्या दणक्याचीच प्रतीक्षा आहे का?**

**नगरसेवकांना फक्त निवडणुकीपुरतेच रस्ते हवे असतात का?**

धनावत म्हणतात त्याप्रमाणे, जालन्यात अतिक्रमण हटवले की दुसऱ्या दिवशी ते पुन्हा तिथेच असते. हा 'टॉम अँड जेरी'चा खेळ प्रशासनाच्या संगनमताने सुरू आहे की काय, अशी शंका येते.

**प्रशिक्षित नगरसेवकांनो, आता तरी जागे व्हा!**

जालन्यात सध्या 'प्रशिक्षित नगरसेवकांचा' भरणा आहे. प्रशिक्षणाचा उपयोग जर शहराचा श्वास कोंडणारी अतिक्रमणे हटवण्यासाठी होणार नसेल, तर त्या प्रशिक्षणाचा उपयोग काय?

वाहतूक कोंडी: मुख्य रस्त्यांवर पाय ठेवायला जागा नाही.

सुरक्षितता: महिला, वृद्ध आणि शालेय विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून चालावे लागते.

बकालपणा: लांगूलचालनाच्या राजकारणामुळे जालना शहर बकाल होत चालले आहे.

**आमचा रोकडा सवाल!**

प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी हे लक्षात घ्यावे की, शहराचे नियोजन आणि सार्वजनिक जागांचे संरक्षण ही तुमची जबाबदारी आहे, उपकार नव्हे.

भावी पिढीला बकाल शहर देण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला? जर मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई पालिकेला धारेवर धरले असेल, तर जालन्यातील जनतेचा संयम सुटण्याआधी प्रशासनाने 'क्शन मोड'मध्ये येणे गरजेचे आहे.

आता चेंडू जिल्हाधिकारी तथा आयुक्त आणि नवनिर्वाचित नगरसेवकांच्या कोर्टात आहे. तुम्ही कर्तव्याला जागणारे लोकसेवक ठरणार की अतिक्रमणांसमोर गुडघे टेकणारे हतबल अधिकारी? जालन्याची जनता बघत आहे!

# भोकरदनच्या ऐतिहासिक रामेश्वर मंदिरात महाशिवरात्रीचा उत्साह; दर्शनासाठी शिवभक्तांच्या लांबच लांब रांगा

**आत्ताच णक्सप्रेस**

**भोकरदन प्रतिनिधी/ सोपान प्र. सपकाळ**/ भोकरदन देवाधिदेव महादेव यांच्या उपासनेचा सर्वात मोठा सण असलेल्या महाशिवरात्रीचे औचित्य साधून, भोकरदन येथील प्राचीन व प्रसिद्ध हेमाडपंती रामेश्वर मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. हर हर महादेवच्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर दुमदुमून गेला होता.

पहाटेपासूनच भाविकांची मांदियाळी महाशिवरात्रीनिमित्त रामेश्वर मंदिरात पहाटेपासूनच विधीवत पूजा आणि अभिषेक करण्यात आला. यानंतर दर्शनासाठी मंदिराचे दरवाजे उघडताच भोकरदन शहरासह ग्रामीण भागातील हजारो भाविकांनी रांगा लावल्या. यामध्ये महिला, पुरुष आणि आबालवृद्धांचा मोठ्या प्रमाणावर समावेश होता. हेमाडपंती वास्तुकलेचा वारसा लाभलेल्या या मंदिरात महादेवाच्या पिंडीचे दर्शन घेण्यासाठी शिवभक्तांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.

**सेवाभावी उपक्रमः** फराळ आणि चहाची व्यवस्था येणाऱ्या प्रत्येक शिवभक्ताला दिलासा मिळावा, यासाठी मंदिर संस्थानचे पदाधिकारी आणि शहरातील दानशूर व्यक्तींच्या वतीने विशेष सोय करण्यात आली होती. सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत सर्व भाविकांसाठी:

मोफत फराळ (साबुदाणा खिचडी व इतर पदार्थ)

गरम चहाची मुबलक व्यवस्था करण्यात आली होती. संस्थानच्या स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध पद्धतीने भाविकांना प्रसादाचे वाटप केले.



**यात्रेचे स्वरूप आणि पोलीस बंदोबस्त**

मंदिर परिसरात विविध पूजा साहित्याची दुकाने, खेळणी आणि खाद्यपदार्थांच्या स्टॉल्समुळे या परिसराला एखाद्या यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. गर्दीचे नियोजन करण्यासाठी आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दर्शन रांगेवर नियंत्रण ठेवण्यासाठी होमगार्ड आणि पोलीस कर्मचाऱ्यांनी चोवीस तास सेवा बजावली. भक्ती, शक्ती आणि सेवा यांचा त्रिवेणी संगम आज रामेश्वर मंदिर परिसरात पाहायला मिळाला. रात्री उशिरापर्यंत भाविकांचा ओघ सुरूच होता.

# 'हर हर महादेव'च्या जयघोषात पंचमुखी महादेव मंदिर दुमदुमले

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी / किरण खानापुरे**/ 'हर हर महादेव'च्या जयघोषात पंचमुखी महादेव मंदिर दुमदुमले; भाविकांची दर्शनासाठी अलोट गर्दीआज महाशिवरात्रीच्या पवित्र पर्वावर शहरातील प्रसिद्ध पंचमुखी महादेव मंदिरात भाविकांचा जनसागर उसळल्याचे पाहायला मिळाले. पहाटेपासूनच महादेवाच्या दर्शनासाठी भक्तांनी लांबच लांब रांगा लावल्या होत्या. 'हर हर महादेव' आणि 'ओम नमः शिवाय'च्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला होता.



**भक्ती आणि सेवेचा संगम**

महाशिवरात्रीचे औचित्य साधून मंदिर प्रशासनाच्या वतीने महादेवाला अभिषेक आणि विशेष पूजा अर्चा करण्यात आली. केवळ दर्शनच नव्हे, तर मंदिर परिसरात सेवाभावी वृत्तीने विविध उपक्रम राबवण्यात आले. दर्शन घेऊन बाहेर पडणाऱ्या भाविकांसाठी मंदिर आवारात केळी, द्राक्षे आणि केशरी दुधाचे वाटप करण्यात आले. उन्हाचा वाढता तडाखा लक्षात घेता, थंडगार दूध आणि फलाहाराच्या प्रसादामुळे भाविकांना मोठा दिलासा मिळाला.

**शिस्तबद्ध नियोजन**

गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी मंदिर समिती आणि स्थानिक स्वयंसेवकांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. रांगेत उभ्या असलेल्या ज्येष्ठ नागरिकांची आणि महिलांची विशेष काळजी घेण्यात येत होती. मंदिरावर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट भाविकांचे मुख्य आकर्षण ठरली.

**उत्सवाचा उत्साह**

दुपारच्या आरतीवेळी भक्तांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. शंखनाद आणि डमरूच्या आवाजात 'हर हर महादेव'चा जो जयघोष झाला, त्याने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. सायंकाळपर्यंत दर्शनासाठी ही गर्दी कायम होती. महादेवाच्या चरणी नतमस्तक झाल्यावर मिळणारी शांती शब्दांत मांडता येणार नाही. त्यातच प्रसादाची सोय केल्यामुळे भक्तांना खूप आनंद होत आहे. **- दर्शनासाठी आलेले एक भाविक**

# राजूर चौफुलीच्या उड्डाणपुलाखालील रखडलेला प्रश्न सुटणार; दोन्ही बाजूंनी होणार ७.५ मीटरचे सिमेंट रस्ते!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ जालना शहरातील राजूर चौफुली परिसरातील वाहतुकीची कोंडी आणि खराब रस्त्यांच्या समस्येतून आता नागरिकांची लवकरच सुटका होणार आहे. येथील उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूचे रस्ते आता साडेसात मीटर रुंदीचे सिमेंट काँक्रिटचे करण्यात येणार असून, सोबतच पाण्याचा निचरा होण्यासाठी दोन मीटरच्या भव्य सिमेंट नाल्यांचेही बांधकाम केले जाणार आहे. भाजपचे जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे.

**सध्याची भीषण स्थिती आणि नागरिकांचा मनस्ताप**

राजूर चौफुलीजवळील उड्डाणपुलाखालील रस्ते सध्या अत्यंत अरुंद (केवळ ४ मीटर) आहेत. हे रस्ते पूर्णपणे उखडले असून त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. यामुळे येथे दररोज तासनतास वाहतूक ठप्प होत आहे. विशेषतः पावसाळ्यात मार्केट कमिटी परिसरातील १५० ते २०० हेक्टर क्षेत्रातील पाणी याच ठिकाणी साचत असल्याने रस्ते पूर्णपणे चिखलमय आणि वाहतुकीसाठी अयोग्य बनले आहेत. याचा मोठा मनस्ताप वाहनधारक आणि स्थानिक नागरिकांना सहन करावा लागत होता.

**भास्कर आबा दानवे यांचा पुढाकार**

या गंभीर समस्येची दखल घेत भास्कर आबा दानवे यांनी नॅशनल हायवेच्या मुख्य अभियंत्यांशी थेट दूरध्वनीवरून संवाद साधला. त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आणून देत, याठिकाणी केवळ दुरुस्ती न करता ७.५ मीटरचे रुंद सिमेंट रस्ते आणि पाण्याचा निचरा होण्यासाठी २ मीटरच्या सिमेंट नाल्यांची मागणी केली.

**प्रशासकीय पाहणी आणि तात्काळ निर्णय**

दानवे यांच्या सूचनेनंतर नॅशनल हायवेच्या मुख्य अभियंत्यांनी अकोला विभागाला तातडीने पाहणीचे आदेश दिले. त्याअनुषंगाने दिनांक १३/०२/२०२६ रोजी:




अकोला विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. चव्हाण उपअभियंता श्री. कचाळे

यांनी राजूर चौफुलीवर येऊन प्रत्यक्ष स्थितीची पाहणी केली. मार्केट कमिटीकडून येणाऱ्या पावसाच्या पाण्याचा लोंढा आणि रस्त्यांची दुरावस्था पाहता, येथे साडेसात मीटरचे सिमेंट रस्ते आणि नाल्यांची आवश्यकता असल्याचा अहवाल त्यांनी मुख्य अभियंत्यांना सादर केला.

**पुढील पाऊलः अंदाजपत्रकाचे निर्देश**

पाहणी अहवाल प्राप्त होताच, मुख्य अभियंत्यांनी या कामाचे अंदाजपत्रक (ईींवसशीं ऐींळारींश) तात्काळ तयार करून मंजुरीसाठी सादर करण्याचे निर्देश कार्यकारी अभियंता चव्हाण यांना दिले आहेत. यामुळे या कामाच्या निविदा प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला आहे.

या पाहणी दौऱ्यावेळी महानगरपालिकेचे तांत्रिक सल्लागार इंजि. विष्णू डोंगरे, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचे स्वीय सहायक गोवर्धन कोल्हे व इतर मान्यवर उपस्थित होते. या निर्णयामुळे जालना शहराच्या प्रवेशद्वारावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार असल्याचे बोलले जात आहे.

## ॲड. भास्कर मगरे यांचा इशारा: बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी जिल्हास्तरावर जनजागृती मोहिमेचा प्रारंभ

# असंघटित कामगारांच्या हक्कासाठी शिवसेना दलित आघाडी आक्रमक; जिल्हाभर आंदोलनासह मेळाव्यांचे रान पेटवणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन प्रतिनिधी**/ जालना जिल्ह्यातील आणि मराठवाड्यातील दलित, आदिवासी तसेच भूमिहीनांच्या प्रश्नावर शिवसेना दलित आघाडी आता अधिक आक्रमक झाली आहे. या वर्गाच्या प्रलंबित प्रश्नांसाठी रस्त्यावरचा संघर्ष उभारण्यासोबतच, आता असंघटित क्षेत्रातील कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी जिल्हास्तरावर मोठे संघटन उभारणार असल्याची घोषणा शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे यांनी केली.

भोकरदन येथे शिवसेना दलित आघाडीच्या वतीने आयोजित 'तालुकास्तरीय रोजगार विषयक चर्चासत्र व शिबिरात' ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

**योजनांच्या लाभापासून कामगार वंचित**

ॲड. मगरे यांनी आपल्या मार्गदर्शनात सरकारी योजनांमधील त्रुटींवर बोट ठेवले. ते म्हणाले की, महाराष्ट्र शासनाचा कामगार विभाग बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी अनेक पावले उचलत आहे. मात्र, असंघटित क्षेत्रात भक्कम संघटना नसल्यामुळे कामगारांमध्ये कमालीची अनास्था आणि अज्ञान आहे. परिणामी, शासनाच्या कोट्यवधींच्या योजनांचा लाभ खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. हे चित्र बदलण्यासाठी आम्ही तालुकास्तरावर चर्चासत्रे, शिबिरे आणि मेळाव्यांचे आयोजन करून जनजागृती करणार आहोत.

**सुरक्षा साधनांचा आग्रह धरणे काळाची गरज**

बांधकाम क्षेत्रात काम करताना होणारे अपघात टाळण्यासाठी कामगारांनी स्वतः च्या सुरक्षेबाबत सजग राहण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रत्येक बांधकाम कामगाराने कामाच्या ठिकाणी हेल्मेट, हँड ग्लोज, सुरक्षा बूट, सुरक्षा बेल्ट आणि जॅकेट यांसारख्या अत्यावश्यक वस्तूंचा आग्रह मालकांकडे धरला पाहिजे, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

**कामगारांसाठी असलेल्या महत्त्वपूर्ण शासकीय योजनाः**

या मेळाव्यात ॲड. मगरे यांनी नोंदणीकृत कामगारांना मिळणाऱ्या विविध सवलतींची सविस्तर माहिती दिली: प्रसूती सहाय्य: महिला बांधकाम कामगारांना नैसर्गिक प्रसूतीसाठी आर्थिक मदत दिली जाते.

शैक्षणिक लाभ: कामगारांच्या पाल्यांना शालेय स्कॉलरशिप आणि इतर शैक्षणिक सुविधांची तरतूद आहे.

विमा संरक्षण: कामावर असताना अपंगत्व आल्यास विम्याची रक्कम मिळते.

मुलीच्या जन्मावर ठेव: एका मुलीच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन केल्यास मुलीच्या नावे १ लाख रुपयांची मुदत ठेव शासनाकडून दिली जाते.

पुढील दिशा: तालुकास्तरीय मेळावे

जालना जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात अशा प्रकारच्या चर्चासत्रांचे आयोजन करून असंघटित कामगारांची नोंदणी करणे आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हे शिवसेना दलित आघाडीचे मुख्य उद्दिष्ट



राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाला तालुक्यातील भूमिहीन मजूर, कास्तकार, दलित-आदिवासी बांधव आणि मोठ्या संख्येने बांधकाम कामगार उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अँण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813